राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ
महाविद्यालय विकास विभाग
छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२

क्र.म.वि.वि./७६२९ दिनांक : १४/०९/२०१७

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना सुचिंत करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ११४ व निर्देश क्र.८२/२०१६ नुसार निरंतर संलग्निकरणासाठी (continuation of affiliation) पुर्वी दिलेल्या संलग्निकरणाचा कालावधि संपण्यापुर्वी म्हणजे दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत शुल्क भरून अर्ज करावा लागतो. महाविद्यालयाचे निरंतर संलग्निकरणाचे अर्ज प्राप्त झाल्यावर त्यावर विद्यापीठाकडून कार्यवाही होऊन महाविद्यालयांना नवीन सत्र सुरू होण्यापुर्वी संलग्निकरणाविषयी कळविणे निर्देशातील तरतुदीनुसार बंधनकारक आहे. परंतु स्थानीय चौकशी समित्या नियुक्त करणे, समित्यांच्या नियुक्तीविषयी महाविद्यालयांना कळविणे, समित्यांच्या महाविद्यालयांना भेटी होणे, समित्यांच्या अध्यक्षांकडून अहवाल प्राप्त होणे, प्राप्त झालेले अहवाल छाननी समितीकडून तपासून घेणे, अहवाल विद्वत परिषदेसमोर सादर करणे, व विद्वत परिषदेचा निरंतर संलग्निकरणाविषयीचा निर्णय महाविद्यालयांना कळविणे इत्यादी प्रक्रिया वेळेच्या आत पुर्ण करण्याचे दृष्टाने व महाविद्यालयांना निरंतर संलग्निकरण योग्य वेळी प्राप्त व्हावे यासाठी आधिष्ठाता समितीने सुचविल्याप्रमाणे निरंतर संलग्निकरणाच्या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर विहीत कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्याच्या हेतुने मा. कुलगुरूंनी विद्वत परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अतर्गत पुढीलप्रमाणे निरंतर संलग्निकरण प्रदान करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे.

करिता सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी विद्यापीठाद्वारे निरतर संलग्निकरणासाठी खालील प्रमाणे निश्चित केलेल्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. जी महाविद्यालये वेळापत्रकानुसार कार्यवाही घेणार नाहीत अशा महाविद्यालयांच्या नंतर प्राप्त होणा–या निवेदनांवर कोणतीही कार्यवाही घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

निरंतर संलग्निकरणाच्या प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | संलग्निकरणाचा कालावधी वाढवुन देण्याकरिता महाविद्यालयांकडून शुल्कासह आवेदन प्राप्त होण्याची अंतिम तारीख. | ३१ ऑगस्ट |
| २ | जे महाविद्यालय ३१ ऑगस्ट या अंतिम तारखेपर्यंत ऑनलाईन अर्ज करणार नाही त्यांना विलंबशुल्कासह अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख. | १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर |
| ३ | स्थानिय चौकशी समित्या नियुक्त करण्याकरिता अधिष्ठाता समितीची सभा आयोजीत करून गठीत समित्यांच्या याद्या प्राप्त करणे. | ३० ऑक्टोबर |
| ४ | महाविद्यालयांना व समितीच्या सदस्यांना विद्यापीठाकडुन स्थानिय चौकशी समितीच्या नियुक्तीविषयी पत्रे पाठविणे. | १५ नोव्हेंबर |
| ५ | स्थानिय चौकशी समित्यांनी महाविद्यालयांना भेटी देऊन अहवाल सादर करणे. | १६ नोव्हेंबर ते १५ जानेवारी |
| ६ | प्राप्त अहवाल छाननी समितीसमोर ठेवून छाननी समितीची प्रक्रिया पुर्ण करणे. | २८ फेब्रुवारी |

| | | |
|---|---|---|
| ७ | छाननी समितीच्या शिफारशीसह अहवाल विद्वत परिषदेसमोर किंवा १२(७) अंतर्गत मान्यता घेणे. | १५ मार्च |
| ८ | संबंधीत महाविद्यालयांना विद्वत परिषदेचा निरंतर संलग्निकरणासंबंधीचा निर्णय कळविणे. | ३० मार्च |
| ९ | संलग्निकरणाच्या निर्णयासंबंधात महाविद्यालयाला आक्षेप असल्यास मा. कुलगुरूकडे अपिल सादर करण्याची अंतीम तारीख. | १५ एप्रिल |
| १० | अपिलावर प्रक्रिया करून अंतीम निर्णय कळविण्याची शेवटची तारीख | ३० एप्रिल |

मा. कुलगरूंच्या आदेशानुसार,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव(म.वि.)
(अति.कार्य.)

प्रतिलिपी माहिती व कार्यवाहीसाठी सादर:—

१. संलग्नित महाविद्यालयांचे सर्व सन्माननिय प्राचार्य,
२. विद्याशाखांचे सर्व सन्माननिय अधिष्ठाता,
३. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
४. मा. वित्त व लेखा अधिकारी,
५. उपकुलसचिव(विद्या विभाग)
६. उपकुलसचिव (परीक्षा पुर्व),
७. स.कु.स.(सामान्य परीक्षा विभाग),
८. स.कु.स.(परीक्षा व चौकशी),
९. स.कु.स.(गोपनीय विभाग),
१०. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक,
११. मा. प्र—कुलगुरूंचे स्वीय सहायक,

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

(डॉ. रमण मदने)
सहायक कुलसचिव(म.वि.)